जिल्हा परिषद, परभणी

**निवडणूक तात्काळ**

क्रमांक २०१६/निवडणूक/ जिपपंस/सिआर

जिल्हाधिकारी कार्यालय परभणी

दिनांकः- 26/9 /२०१६.

27 SEP 2016

**प्रति,**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**

**जिल्हा परिषद परभणी.**

**विषयः- जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक -२०१६**

**जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या पंचायत समित्यांची निवडणूक विभाग व निर्वाचक गणाची रचना व आरक्षणाची सोडत काढण्याबाबतचा कार्यक्रम.**

संदर्भः- मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांचे आदेश क्रमांक रानिआ / प्र.क्र. १६/जिपपंस-२०१६ / का.७/ दिनांक १८/०८/२०१६.

12803
26/9

उपरोक्त संदर्भान्वये मा. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार परभणी जिल्हयातील निवडणूक विभाग आणि निर्वाचक गणांची जिल्हास्तरावर आणि तालुकास्तरावर दिनांक ५/१०/२०१६ रोजी आरक्षणाची सोडत काढावयाची आहे. त्यानुसार आरक्षणाची सोडत काढण्याचे दृष्टीने जिल्हास्तरावर व तालुकास्तरावर विशेष सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

सदर विशेष सभांच्या आयोजनाबाबत प्रसिध्दीकरीता जाहिर प्रगटन वृत्तपत्रात दिलेले आहे. तसेच सदर जाहिर प्रगटणाची प्रत जिल्हा परिषद परभणीच्या नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्याकरीता सोबत जोडण्यात येत आहे. सदर जाहिर प्रगटन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करावे तसेच आपले कार्यालयाचे वेबसाईटवर देखिल प्रसिध्द करावे व तसा अनुपालन अहवाल तात्काळ या कार्यालयात सादर करावा.

**सहपत्र - वरीलप्रमाणे**

**जिल्हाधिकारी परभणी.**

क्रमांक २०१६/निवडणूक/ जिपपंस/सिआर-
जिल्हाधिकारी कार्यालय परभणी.
दिनांकः- २८/०९/२०१६.

## जाहीर प्रगटन

महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ मधील कलम १२ उपकलम (१), कलम ५८ (१)(अ) प्रमाणे व महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पध्दत व चक्रानुक्रम) नियम, १९९६ नुसार अनुक्रमे निवडणूक विभाग व निर्वाचक गण प्रसिध्द करण्यापुर्वी जिल्हा परिषद व पंचायत समिती क्षेत्रात सभा घेऊन अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांसह राखून ठेवावयाच्या जागा निश्चित करावयाच्या आहेत. त्याकरिता आरक्षणाची सोडत पध्दतीने कार्यवाही करण्याकरिता खाली दर्शविल्याप्रमाणे विशेष सभांचे आयोजन करण्यात आले आहे.

| अ क्र | निवडणूक विभाग व निर्वाचक गणांचे नांव | सभेचे ठिकाण | सभेचा दिनांक व वेळ |
|---|---|---|---|
| ०१ | जिल्हा परिषद, परभणी (निवडणूक विभागांसाठी) | सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय परभणी | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| ०२ | पंचायत समिती, जिंतुर (निर्वाचक गणांसाठी) | तहसील कार्यालय, जिंतुर | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| ०३ | पंचायत समिती, परभणी (निर्वाचक गणांसाठी) | तहसील कार्यालय, परभणी | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| ०४ | पंचायत समिती, मानवत (निर्वाचक गणांसाठी) | तहसील कार्यालय, मानवत | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| ०५ | पंचायत समिती, सेलु (निर्वाचक गणांसाठी) | तहसील कार्यालय, सेलु | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| ०६ | पंचायत समिती, पाथरी (निर्वाचक गणांसाठी) | तहसील कार्यालय, पाथरी | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| ०७ | पंचायत समिती, सोनपेठ (निर्वाचक गणांसाठी) | तहसील कार्यालय, सोनपेठ | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| ०८ | पंचायत समिती, पालम (निर्वाचक गणासाठी) | तहसील कार्यालय, पालम | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| ०९ | पंचायत समिती, पुर्णा (निर्वाचक गणांसाठी) | तहसील कार्यालय, पुर्णा | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |
| १० | पंचायत समिती, गंगाखेड (निर्वाचक गणांसाठी) | तहसील कार्यालय, गंगाखेड | ५/१०/२०१६ वेळ सकाळी ११.०० वा |

जिल्हा परिषद अथवा पंचायत समितीतील ज्या रहीवाशांची सदर सभेस हजर राहण्याची इच्छा आहे त्यांनी उपरोक्त ठिकाणी व वेळी उपस्थित राहावे.

**जिल्हा :-परभणी**

**दिनांकः-२८/०९/२०१६**

जिल्हाधिकारी परभणी